राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर या संस्थेत मे. महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ (मेस्को), पुणे यांचेकडील ०९ सुरक्षारक्षकांच्या सेवा करारास मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन निर्णय क्रमांकः सुरक्षा-०५२५/प्र.क्र.१९७/ई-११४२९०१/प्रशा-२

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
गो. ते. संकुल इमारत, ९ वा मजला, मंत्रालय, मुंबई.
तारीख : ०५ ऑगस्ट, २०२६

वाचा -

१) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांकः एसजीए-१५०६/प्र.क्र.९२/काम-५, दिनांक ०८.११.२००६.
२) शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांकः एसजीए-२०१४/प्र.क्र.३००(२)/कामगार-५, दिनांक ३०.०७.२०१४.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम/भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
४) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांकः सुरक्षा-०५२५/प्र.क्र.१९७/प्रशा-२, दिनांक २४.०६.२०२५.
५) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. डीएमईआर-१६०४०/४१/२०२६-EDU, दिनांक २९.०६.२०२६.

प्रस्तावना -

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर या संस्थेमध्ये प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थिनी, प्राध्यापक/सह प्राध्यापक तसेच अन्य शासकीय कर्मचारी व संस्थेतील यंत्रसामुग्री, फर्निचर व इतर मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने संदर्भ क्र. ४ च्या शासन निर्णयान्वये बाह्यस्त्रोताद्वारे मे. महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ, पुणे (मेस्को) यांचेकडून ०९ सुरक्षारक्षकांची सेवा दिनांक २५.०६.२०२५ ते दिनांक ३१.०५.२०२६ या कालावधीसाठी उपलब्ध करून घेण्यास व त्याकरिता येणाऱ्या रुपये ३९,३५,००७/- (जी. एस. टी. सह) एवढ्या वार्षिक खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर मान्यतेनुसार अधिष्ठाता, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर यांनी मे. महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ, पुणे यांचेसमवेत संस्थास्तरावर करार केला

होता.सदर कराराचा कालावधी दिनांक ३१.०५.२०२६ रोजी संपुष्टात आल्याने, मे. महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ, पुणे यांनी दिनांक ०१.०६.२०२६ ते दिनांक ३१.०५.२०२७ या कालावधीसाठी सुरक्षा सेवेच्या करारास मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली आहे. त्यानुषंगाने आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांनी संदर्भ क्र. ५ च्या पत्रान्वये सदर सेवेस्तव रुपये ४०,०८,५५६/- (जी. एस. टी. सह) एवढ्या वार्षिक खर्चास प्रशासकीय मान्यता मिळण्याची विनंती केली आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय अधिपत्याखालील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर येथे प्रवेशित विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच संस्थेमधील प्राध्यापक/सह प्राध्यापक व अन्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बाह्यस्रोताद्वारे मे. महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ, पुणे यांचेकडून ०९ सुरक्षारक्षकांची सेवा दिनांक ०१.०६.२०२६ ते दिनांक ३१.०५.२०२७ या कालावधीसाठी उपलब्ध करून घेण्यास व त्याकरिता येणाऱ्या रुपये ४०,०८,५५६/- (अक्षरी रुपये चाळीस लाख आठ हजार पाचशे छप्पन्न फक्त) (जी. एस. टी. सह) एवढ्या वार्षिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

पदनाम	आवश्यक पदसंख्या	एका पदाकरीता येणारा मासीक खर्च	एकुण पदांकरीता येणारा मासीक खर्च	एकुण पदांकरीता येणारा वार्षिक खर्च
सुरक्षा रक्षक	०९	३१,४५४.४६	२,८३,०९०	३३,९७,०८२/-
			१८ टक्के जी. एस. टी.	६,११,४७४/-
			एकूण खर्च	४०,०८,५५६/-

२. उपरोक्त सेवेसाठी महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ, पुणे यांच्याशी संस्थास्तरावर आवश्यक करार करण्यात यावा.

३. सदर बाबींसाठी येणारा खर्च राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर या संस्थेच्या (२२१०५०७७) लेखाशिर्षाखाली (१०) कंत्राटी सेवा या उद्दिष्टांतर्गत उपलब्ध निधीमधून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १७.०४.२०१५, वित्तीय अधिकार नियम भाग पहिला, उप विभाग -४, अ.क्र. ११ अन्वये प्रशासनिक विभागास असलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०५१२०२५०६१५१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MAHADEO GIRDHARI JOGDAND

Digitally signed by MAHADEO GIRDHARI JOGDAND
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDD, 2.5.4.20=0477D837DC0B00FC2CBD45D17D07C625C3417378F97D493A8A277FAA29F65459, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C1D08CFDEE92DA209D709F5456D9EDE95236B8A8E7E2A2801B8FED03DCF793D3, cn=MAHADEO GIRDHARI JOGDAND
Date: 2026.08.05 13:01:26 +05'30'

(म. गि. जोगदंड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) ½, महाराष्ट्र, मुंबई.
२. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
४. महाव्यवस्थापक, महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (मेस्को), पुणे
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
७. अधिष्ठाता, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर.
८. निवडनस्ती (प्रशा-२)